महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा),
गट-ब मधील अधिकाऱ्यांच्या बदल्या
अधिक्षक व तत्सम पदे

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली ३११७/प्र. क्र.१०६/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १६ फेब्रुवारी, २०१८

वाचा:- १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. ईएसटी-३९१७/प्र. क्र.४६/प्रशा-२, दिनांक १७.३.२०१७.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. बदली-३११७/प्र. क्र.१०६/प्रशा-२, दिनांक ७.७.२०१७.

-शासन आदेश-

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ हा दि. १ जुलै, २००६ पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमातील कलम ६ नुसार बदली करण्याबाबत सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात आले आहेत. तसेच या कलमाच्या परंतुक २ नुसार बदली करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याला, सर्वसाधारण व विशेष आदेशाद्वारे या कलमाखाली त्याचे अधिकार त्यांच्या कोणत्याही दुय्यम प्राधिका-याकडे सोपविता येतील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

२. महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट ब मधील विविध संवर्गातील अधिकाऱ्यांची बदलीने पदस्थापना करण्यासाठी मा. मंत्री हे सक्षम प्राधिकारी आहेत. श्री. प्र. म. मिश्रा, अधिक्षक, मशिसे गट-ब यांची दिनांक ७. ७. २०१७ च्या आदेशान्वये सोलापूर (प्राथ.) येथून औरंगाबाद (माध्य.) येथे बदली करण्यात आली होती. सदर पदावर ते रूजू झाले नाहीत. मा. मंत्री यांच्या आदेशानुसार खालील तक्त्यात नमूद केलेल्या अधिकाऱ्यांची दिनांक ७. ७. २०१७ च्या बदली आदेशान्वये करण्यात आलेली बदली वैद्यकीय व प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व पदनाम	दिनांक ७.७.२०१७ च्या आदेशान्वये करण्यात आलेल्या बदलीचे ठिकाण	अभिप्राय
१	२	३	४
१.	श्री. पी. एम. मिश्रा अधीक्षक, वे.व भ.नि.नि.पथक (प्राथ.), सोलापूर	अधीक्षक, वे. व भ.नि.नि.पथक (माध्य.), औरंगाबाद	श्री. मिश्रा यांचे प्रशासकीय व वैद्यकीय कारणास्तव दिनांक ७.७.२०१७ चे बदली आदेश रद्द करण्यात येत आहेत.

३. आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी वरील आदेशानुसार तातडीने कार्यवाही करावी.

४. सदर आदेश बदली अधिनियम २००५ मध्ये नमूद कलम ४ (४) व (५) मधील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२०१३०९१११४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2018.02.20 13:11:16 +05'30'

(र. प्र. आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सोलापूर / औरंगाबाद.
३. सर्व संचालक
४. विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, औरंगाबाद/ पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद/पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सोलापूर/शिक्षणाधिकारी (माध्यमिक), औरंगाबाद
७. जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर/औरंगाबाद
८. संबंधित अधिकारी (शिक्षण आयुक्तालयामार्फत)

प्रत माहितीस्तव,

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी
२. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३. निवडनस्ती, प्रशा-२.